क्र.मप्राशिप/सशि/खशा/संगणकीय साहित्य/२०२०-२१/३३८ दि.०२/०२/२०२१

प्रति,

--------------------------

--------------------------

विषय: महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद कार्यालयातील प्राथमिक व माध्यमिक विभागातील संगणक, प्रिंटर्स, लॅपटॉप्स व प्रोजेक्टर्सच्या देखभाल व दुरूस्तीचा वार्षिक सेवाकरार व दरकरार करणेबाबत.

महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद कार्यालयांतर्गत प्राथमिक व माध्यमिक विभागात संगणक, प्रिंटर्स, लॅपटॉप्स व प्रोजेक्टर्स कार्यरत आहेत. सदर संगणक, प्रिंटर्स, लॅपटॉप्स व प्रोजेक्टर्सच्या देखभाल व दुरूस्तीचा तपशील पुढीलप्रमाणे देण्यात येत आहे.

| No. | Particular | Name of the Company | No. | Type of AMC | Rates for AMC | Type of AMC | Rates for AMC |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | **(A) Elementary** | | | | | |
| 1 | Computer | Lenovo | 20 | Comprehensive Basis | | Non Comprehensive Basis | |
| | | Acer | 20 | Comprehensive Basis | | Non Comprehensive Basis | |
| | **Total** | | **40** | | | | |
| 2 | Printer | Epson Colour | 4 | Comprehensive Basis | | Non Comprehensive Basis | |
| | | HP | 20 | Comprehensive Basis | | Non Comprehensive Basis | |
| | | HP Colour | 2 | Comprehensive Basis | | Non Comprehensive Basis | |

| No. | Particular | Name of the Company | No. | Type of AMC | Rates for AMC | Type of AMC | Rates for AMC |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | Brother | 8 | Comprehensive Basis | | Non Comprehensive Basis | |
| | **Total** | | **34** | | | | |
| 3 | Laptop | HP | 21 | Comprehensive Basis | | Non Comprehensive Basis | |
| | **Total** | | **21** | | | | |
| 4 | Projector | Epson | 1 | Comprehensive Basis | | Non Comprehensive Basis | |
| | | Hitachi | 3 | Comprehensive Basis | | Non Comprehensive Basis | |
| | **Total** | | **4** | | | | |
| **(B) Secondary** | | | | | | | |
| 1 | Computer | Lenovo | 20 | Comprehensive Basis | | Non Comprehensive Basis | |
| | | Acer | 5 | Comprehensive Basis | | Non Comprehensive Basis | |
| | **Total** | | **25** | | | | |
| 2 | Printer | HP | 7 | Comprehensive Basis | | Non Comprehensive Basis | |
| | | Samsung | 4 | Comprehensive Basis | | Non Comprehensive Basis | |
| | | Konica | 1 | | | | |
| | **Total** | | **12** | | | | |
| 3 | Laptop | HP | 4 | Comprehensive Basis | | Non Comprehensive Basis | |
| | | Acer | 1 | Comprehensive Basis | | Non Comprehensive Basis | |
| | | Dell | 2 | Comprehensive Basis | | Non Comprehensive Basis | |
| | | Lenovo | 1 | Comprehensive Basis | | Non Comprehensive Basis | |
| | **Total** | | **8** | | | | |

| No. | Particular | Name of the Company | No. | Type of AMC | Rates for AMC | Type of AMC | Rates for AMC |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 4 | Projector | Optima | 1 | Comprehensive Basis | | Non Comprehensive Basis | |
| | **Total** | | **1** | | | | |
| | **Total Computer (A+B)** | | **65** | | | | |
| | **Total Printer (A+B)** | | **46** | | | | |
| | **Total Laptop (A+B)** | | **29** | | | | |
| | **Total Projector (A+B)** | | **5** | | | | |

वरील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे संगणक, प्रिंटर्स, लॅपटॉप्स व प्रोजेक्टर्सचा वॉरंटी कालावधी संपुष्टात आलेला आहे. मात्र, सदर संगणक, प्रिंटर्स, लॅपटॉप्स व प्रोजेक्टर्स सुस्थितीत कार्यरत आहेत. या कार्यालयातील कार्यरत असलेल्या संगणक, प्रिंटर्स, लॅपटॉप्स व प्रोजेक्टर्सच्या देखभाल व दुरूस्तीबाबतचा वार्षिक सेवाकरार करण्यासाठी वार्षिक सेवाकरारातील अटी व शर्ती पुढीलप्रमाणे आहेत.

१. सदर संगणक, प्रिंटर्स, लॅपटॉप्स व प्रोजेक्टर्स या सर्व संगणकीय साहित्यांच्या देखभाल व दुरूस्तीची कामे सेवाकरारधारकास करावी लागणार आहेत. तसेच भविष्यात नवीन संगणक, प्रिंटर्स, लॅपटॉप्स व प्रोजेक्टर्स या कार्यालयामार्फत खरेदी करण्यात आल्यास त्या संगणक, प्रिंटर्स, लॅपटॉप्स व प्रोजेक्टर्सच्या किरकोळ देखभाल व दुरूस्तीचे कामही पुरवठादारास करावे लागणार आहे व त्याकरिता कोणताही अतिरिक्त खर्च दिला जाणार नाही.

२. संगणक, प्रिंटर्स, लॅपटॉप्स व प्रोजेक्टर्सच्या देखभाल व दुरूस्तीचे काम महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद कार्यालय, मुंबई व पुणे येथे उपस्थित राहून करावे लागणार

आहे.  परंतु, अपवादात्मक परिस्थितीत संगणक, प्रिंटर्स, लॅपटॉप्स व प्रोजेक्टर्सच्या देखभाल व दुरूस्तीची कामे करण्यासाठी संगणकीय साहित्य कार्यालयाच्या बाहेर घेऊन जावे लागल्यास सह संचालक (प्रशासन), मप्राशिप, मुंबई यांच्या परवानगीने संगणक, प्रिंटर्स, लॅपटॉप्स व प्रोजेक्टर्स पुरवठादार कार्यालयाबाहेर दुरूस्तीसाठी घेऊन जाऊ शकतात.

३. सदर सेवाकरारांतर्गत संगणक, प्रिंटर्स, लॅपटॉप्स व प्रोजेक्टर्सच्या देखभाल व दुरूस्तीबाबत नियमितपणे सर्व्हिसिंग करणे, आवश्यकतेनुसार संगणकीय साहित्याचे नवीन स्पेअर पाट्र्स बसविणे, सॉफ्टवेअरसंबंधी समस्यांचे निवारण करणे इ.कामाची जबाबदारी पुरवठादाराची राहील.

४. या कार्यालयातील संगणक, प्रिंटर्स, लॅपटॉप्स व प्रोजेक्टर्सच्या देखभाल व दुरूस्तीचा वार्षिक सेवाकरार एक वर्षाकरिता करण्यात येणार आहे.  तसेच सेवाकरार कालावधीमध्ये पुरवठादाराने प्रदान केलेली सेवा समाधानकारक असल्यास पुढील एक वर्षासाठी त्याच दराने सेवाकरारास प्राधिकृत अधिकारी यांच्या मान्यतेने मुदतवाढ देण्यास विचार करता येऊ शकेल.

५. पुरवठादाराने त्यांचा दर Excluding GST असा सादर करण्यात यावा.

६. सदर सेवाकरारानुसार संगणक, प्रिंटर्स, लॅपटॉप्स व प्रोजेक्टर्सच्या देखभाल व दुरूस्तीसाठी सेवाकरारधारकाची देयके दर तीन महिन्यांनी (Quarterly) अदा करण्यात येतील.

७. पुरवठादार त्यांचा दर सादर करण्यापूर्वी या कार्यालयातील संगणक, प्रिंटर्स, लॅपटॉप्स व प्रोजेक्टर्सची पाहणी करू शकतात.

८. पुरवठादाराने पुढीलप्रमाणे नमूद केलेली कागदपत्रे स्वतंत्र लिफाफयामध्ये जोडणे आवश्यक आहे. सदर लिफाफ्यावर संगणक, प्रिंटर्स, लॅपटॉप्स व प्रोजेक्टर्सच्या देखभाल व दुरूस्तीसाठी तांत्रिक निविदा असे लिहिणे आवश्यक आहे.

a) दुकाने व आस्थापना नोंदणी प्रमाणपत्राची प्रत.

b) जीएसटी रजिस्ट्रेशनची प्रत (वार्षिक उलाढाल रू.४०.०० लाखापेक्षा जास्त असल्यास).

c) वार्षिक उलाढाल रू.४०.०० लाखापेक्षा कमी असल्यास सेल्फ डिक्लरेशनचे पत्र.

a) मागील ३ वर्षांच्या वार्षिक उलाढालीबाबतचे सनदी लेखापालांनी प्रमाणित केलेले प्रमाणपत्र (सन २०१७-२०१८, २०१८-२०१९, २०१९-२०२०). सन २०१९-२० चे सनदी लेखापालाने प्रमाणित केलेले प्रमाणपत्र उपलब्ध नसल्यास Provisional Balance sheet साक्षांकित प्रत सादर करावी.

d) पॅन कार्डची प्रत.

e) इसारा रकमेपोटी (EMD) रू.१६,३९२/- इतक्या रकमेचा समग्र शिक्षा, मुंबई या नावाने कोणताही राष्ट्रीयकृत किंवा शेड्यूल कमर्शिअल बँकेवर काढलेला (Payable at Mumbai) चा धनाकर्ष पुरवठादारास दरपत्रकासोबत सादर करणे आवश्यक राहील.

९. पुरवठादाराने संगणक, प्रिंटर्स, लॅपटॉप्स व प्रोजेक्टर्सच्या देखभाल व दुरूस्तीसाठीचे दरपत्रक स्वतंत्र लिफाफ्यामध्ये सिलबंद करुन त्यावर संगणक, प्रिंटर्स, लॅपटॉप्स व प्रोजेक्टर्सच्या देखभाल व दुरूस्तीसाठी वित्तीय निविदा असे लिहिणे आवश्यक आहे.

१०. सदर दरपत्रक या कार्यालयाचे संकेतस्थळ https://samagrashiksha.maharashtra.gov.in वर प्रसिध्द करण्यात आले आहे. इच्छुक पुरवठादार सदर संकेस्थळाला भेट देऊन आवश्यक ती माहिती प्राप्त करुन घेऊन विहित मुदतीच्या आत त्यांचे दरपत्रक या कार्यालयास सादर करु शकतील.

११. निवड झालेल्या पुरवठादास सेवाकराराच्या एकूण रकमेच्या ५% प्रमाणे अनामत रक्कम (Security Deposit) सादर करणे बंधनकारक राहील.

१२. पात्र ठरलेल्या पुरवठादाराची इसारा रक्कम (EMD) त्यांच्याकडून अनामत सुरक्षा रक्कम (Security Deposit) सादर केल्यानंतर एक महिन्याच्या आत त्यांना परत करण्यात

येईल. तसेच अपात्र असलेल्या (Unsuccessful) पुरवठादारांची इसारा रक्कम (EMD) निवड प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर एक आठवड्याच्या आत त्यांना परत करण्यात येईल.

१३. संगणक, प्रिंटर्स, लॅपटॉप्स व प्रोजेक्टर्सच्या देखभाल व दुरूस्तीसाठी प्राप्त झालेले कोणतेही दरपत्रक किंवा सर्व दरपत्रके कोणतेही कारण न देता रद्द करण्याचा अधिकार राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई यांना आहेत.

१४. तसेच निवड करण्यात येणाऱ्या पुरवठादाराची सेवा समाधानकारक नसल्यास त्याचा सेवाकरार कोणतेही कारण न देता केव्हाही रद्द करण्याचा अधिकार मा.राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई यांना राहील.

तथापि, आपणास कळविण्यात येते की, वरीलप्रमाणे संगणक, प्रिंटर्स, लॅपटॉप्स व प्रोजेक्टर्सच्या देखभाल व दुरूस्तीचा वार्षिक सेवाकरार करण्याबाबत आपले Comprehensive & Non comprehensive असे दोन्ही प्रकारचे दरपत्रक दि.१०/०२/२०२१ रोजी ३.०० वाजेपर्यंत सीलबंद लिफाफ्यात या कार्यालयास सादर करण्यात यावे.

- Sd-

(राजेंद्र पवार)
राज्य प्रकल्प समन्वयक तथा
सह संचालक (प्रशासन),
म.प्रा.शि.प., मुंबई